# जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय, नागपूर

जा. क्र./प्रस्तु./जिल्हाधिकारी/कावि 769 /2016
रा.मा.क्र. 405/एन ए पी 34/2015 – 2016
जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय, नागपूर
दिनांक :– 7 जून 2016

## परिशिष्ट "ब"

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 42–अ मधील तरतुदींन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/ विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटादारास द्यावयाच्या सनदेचा नमूना,

ज्याअर्थी, जिल्हा नागपूर तालुका हिंगणा गांव वागदरा_च्या सर्व्हे 56 आराजी 1.62 हे. आर प.हं.नं. 56 कृषक जमिनीचा निवासी प्रयोजनार्थ अ / गट क्र./न.भू.क्र. क्षेत्रफळ 1.62 हेक्टर आर क्षेत्र. 16200 चौ.मि.या जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 42–अ च्या तरतूदींन्वये रहिवास/ वाणिज्य/ अन्य अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास नागपूर सुधार प्रन्यास मेट्रो विभाग या नियोजन प्राधिकरणाच्या आदेश जा. कार्यकारी अभियंता मेट्रो/इ अभि.2/5336 दिनांक 06.06.2016 अन्वये विकास/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे, ज्यासंबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालील प्रमाणे .....

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Area of Land as per 7/12** | :- | **16200.00 Sq. M.** |
| 2 | **Area Under Layout As pur K prat** | :- | **16200.00 Sq. M.** |
| 3 | **Gross Area Under Layout** | :- | **16200.00 Sq. M.** |
| 4 | **Area Under Open Space** | :- | **1621.038 Sq. M.** |
| 5 | **Area Under Amenity Spece** | :- | **1620.02 Sq. M.** |
| 7 | **Aera Under Approcah Vehicular Road** | :- | **4141.874 Sq. M.** |
| 8 | **Aera \under Resisential Plots** | :- | **8817.068. Sq. M.** |
| 9 | **Area Land Residential Plots** | :- | **16200.00 Sq. M.** |

जिल्हाधिकारी नागपूर

ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम 47–अ नुसार देय रूपांतरण कराची व वर नमूद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढील प्रमाणे निर्धारीत करण्यात येते.

एकूण क्षेत्र 16200 चौ. मीटर पैकी अकृषिक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र **Aera Under Plots + Area Amenity Space 8817.068+1620.02** म्हणजेच 10437.088 चौ. मीटरला 10 पैसे प्रति चौ.मीटर याप्रमाणे अकृषक महसूल कर रुपये 1044/- व ग्राम पंचायत सेस अकृषिक सा–याचे एवढे 1044 जिल्हा परिषद सारा 7 पट रूपये 7308/- परावर्तीत कर अकृषिक सा–याचे 5 पट म्हणजे रूपये **5220/-** एकूण रक्कम रूपये **14616** आकारणी निर्धारीत

होते.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतूदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतूदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिका–याच्या वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम 42–अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

1) आकारणी : उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसूली योग्य असलेल्या आकारणीऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक 31 जुलै 2017. (वर्ष) रोजी संपणा–या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रूपये **1044/-** (अक्षरी एक हजार चौरेचाळीस फक्त) या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिका–याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

2) उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीवर वसूली योग्य असलेली सर्व कर, दर आणि उपकर भरील.

3) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करू नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून 30 दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

4) उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिका–यास, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतूदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोट कलम (2) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन भोगवटादार याच्या वहिवाटीत असल्याचे चालु ठेवता येईल. त्याची साक्ष म्हणून नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिका–यानी या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक 7 /जूलै 2016 रोजी त्याची स्वाक्षरी केलेली आहे

| (भोगवटादाराची स्वाक्षरी) | (साक्षीदारांच्या स्वाक्ष–या व पदनामे) |
|---|---|
| .................................... | अ) .................................... |
| श्री.विवेक अशोक पाठक तर्फे | श्री Pawan. Raviprasad Gupta |
| ① राहुल जगदिश बोंदरे | ब) .................................... |
| ② अमित मनोहरलाल पाने | श्री Girdhari Mulchand Kawas |

(साक्षीदारांच्या स्वाक्ष–या व पदनामे)

अ) ....................................

श्री Pawan. Raviprasad Gupta

ब) ....................................

श्री Girdhari Mulchand Kawas

आम्ही जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वतः श्री.विवेक अशोक पाठक,प्लॉट नबर.84.ब लक्ष्मीनगर नागपूर यांनी स्वाक्षरी केलेली आहे ती अ. ब. ही व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

(सचिन श. कुर्वे)
जिल्हाधिकारी, नागपूर

प्रतिलिपी :–

1. कार्यकारी अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना माहितीस अग्रेषित.
2. तहसीलदार, हिंगणा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
3. तलाठी –वागदरा माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
4. श्री.विवेक अशोक पाठक,प्लॉट नबर.84.ब लक्ष्मीनगरयांना माहिती तथा उपरोक्त अटी व शर्तीची पूर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी तसेच अकृषिक कराची रूपये 14616/– रक्कम चालानच्या स्वरूपात शासनजमा करण्यासाठी अग्रेषित.

(सचिन श. कुर्वे)
जिल्हाधिकारी, नागपूर